## 1. मॉड्यूल व त्याच्या संरचना

| मॉड्यूल तपशील | |
|---|---|
| विषयाचे नाव | अकाउंटन्सी |
| कोर्स नाव | अकाउंटन्सी 01 (अकरावी , सेमेस्टर - 1) |
| मॉड्यूल नाव | लेखाचा परिचय - भाग 1 |
| मॉड्यूल आयडी | केएके_10103 |
| पूर्व-आवश्यकता | लेखा प्रक्रियेचे मूलभूत ज्ञान |
| उद्देश | या धड्यात गेल्यानंतर, शिकणारे खालील बाबींचा विचार करण्यास सक्षम असतील:<br>अ) व्यवहार<br>आ) व्हाउचर<br>इ) चांगले<br>ई) इंटिटी<br>उ) कॅपिटल<br>ऊ) मालमत्ता<br>ऋ) देयता<br>ऌ) स्टॉक<br>ऍ) विक्री<br>ऎ) उत्पन्न<br>ए) खरेदी<br>ऐ) महसूल |
| सूचनक शब्द | मालमत्ता, उत्तरदायित्व, भांडवल, खर्च, उत्पन्न, खर्च, महसूल |

## 2. विकास कार्यसंघ

| भूमिका | नाव | सदस्यत्व |
|---|---|---|
| राष्ट्रीय MOOC समन्वयक (एनएमसी) | प्रो. अमरेंद्र पी बेहरा | सीआयईटी, एनसीईआरटी, नवी दिल्ली |
| कार्यक्रम समन्वयक | डॉ महंमद. ममूर अली | सीआयईटी, एनसीईआरटी, नवी दिल्ली |
| कोर्स समन्वयक (सीसी) / पीआय | प्रो. शिप्रा वैद्य | डीईएसएस, एनसीईआरटी, नवी दिल्ली |
| विषय विषय तज्ज्ञ (एसएमई) | श्री मती मधु वासवानी | दिल्ली पब्लिक स्कूल, मथुरारोड, नवी दिल्ली |
| पुनरावलोकन टीम | मिस ज्योत्स्ना दावर | राजकीया प्रतिभा विकास विद्यालय, त्यागराज नगर, नवी दिल्ली |
| अनुवादक | श्री पराग कुकडे | |

अनुक्रमाणिका

१. व्यवहार
२. व्हाऊचर
३. माल
४. अस्तित्व
५. भांडवल
६. मालमत्ता
७. देयता
८. साठे
९. विक्री
१०. खरेदी
११. महसूल
१२. उत्पन्न

अकौंटइंग मधील प्रार्थमिक संज्ञा

अकौंटइंग म्हणजे पुस्तकांतील नोंदींचे अर्थ लावून वर्गीकरण करणे होय. यांत केवळ अकौंट च्या नोंदी राखून ठेवणे याचाच समावेश होत नाही तर आर्थिक माहिती तयार करणे ज्यामध्ये व्यवहारांचे मोजमापन आणि व्यापाराच्या संबंधीतल्या इतर घटना यांचा सुद्धा समावेश असतो. अकौंटइंग हि व्यवहाराची भाषा आहे जी संस्थेचे आर्थिक परिणाम विविध वापरकर्त्यांना वेळोवेळी कळवीत असते. संघटनेच्या आर्थिक परिणामांचे मोजमापन करण्यासाठी संस्थेच्या आर्थिक दर्जाची तुलना एकतर तिच्या उद्योग कारखान्यांतील आर्थिक परिणामांशी करावी लागते किवा तिच्या स्वतःच्या भूतकाळांतील परिणामांशी करावी लागते.जसे आपण स्वतःचे आपल्या भाषेद्वारे वर्णन करतो त्याचप्रमाणे व्यापारी कार्यांतील परिणाम हे वेगवेगळ्या अकौंटइंग संज्ञांतून मांडले जातात की ज्यांमुळे त्यांचे परिणामकारक वाचन होऊन, त्यांची क्षमता लक्षात येते आणि व्यापारी संस्थेच्या आर्थिक परिणामांची तुलना करणे शक्य होते. आपण आता अकौंट मधिल प्रार्थमिक संज्ञाचा अभ्यास करूः

व्यवहार

व्यवहार म्हणजे व्यापाराची प्रक्रिया आणि त्याचे भागधारक यांच्यातील परस्पर क्रिया किवा सुसंवाद असतो ज्यांना वज्यांना व्यापारी क्रियांमध्ये खूप रस असतो. व्यापारी व्यवहार अकौंट च्या पुस्तकांमध्ये लिहिले जातात

आणि ते व्यापाराच्या अर्थीक पत्रकांमध्ये सारांश स्वरूपात मांडले जातात कारण ते अशा क्रिया आणि घटनांना सूचित करतात ज्या व्यापाराच्या आर्थिक परीस्तीतीवर परिणाम करतात. व्यापारी व्यवहारांची ठराविक वैशिष्ठे खालीलप्रमाणे आहेत:

१. त्यामध्ये काही आर्थिक मूल्य असलेच पाहिजे जसे त्याचे वर्णन आर्थिक परीभाशेमध्ये करता आले पाहिजे.
२. त्याचे स्त्रोत दस्तऐवजानी समर्थन झाले असले पाहिजे जसे एक व्हाऊचर
३. त्याला दोन प्रकारचे दृष्टीकोन असलेच पाहिजेत जसे प्रत्येक मूल्याच्या अवकीसाठी समसमान मुल्याची जावक हि दिसलीच पाहिजे.

   तो एकतर वस्तूच्या देवाण घेवाणीचा व्यवहार असू शकतो ज्यामध्ये मुल्याची वास्तविक स्वरुपांतील देवाण घेवाण जसे विक्री ,खरेदी,देयके किवा विना देवाण घेवाणीचा व्यवहार सुद्धा असू शकतो जसे पुरामुळे झालेले नुकसान,अग्नीमुळे झालेले नुकसान, घसारा इ.

   व्यापारी व्यवहारांची उदाहरणे खालीलप्रमाणे आहेत :

   १. व्यापारांमध्ये भांडवलाची गुंतवणूक
   २. स्थायी मालमत्ता खरेदी करणे
   ३. लाभांशाचे देयक देणे
   ४. वेतनाचे देयक देणे.

**व्हाऊचर**

प्रत्येक व्यवहार हा अकौंट च्या पुस्तिके मध्ये लिहिला जातो ज्यांतून व्यवहाराला लागणारी सर्व माहिती पुरविली जाते. जेव्हा प्रत्येक व्यवहाराचा व्यापाराच्या आर्थिक स्थितीवर परिणाम होतो, व्यवहार प्रस्थापित होण्यासाठी दस्त ऐवजांचे दाखले असावे लागतात आणि त्याला योग्य अधिकृतता असावी लागते. प्रत्येक व्यवहाराला आधार देणारा हा दस्तऐवजांचा दाखला म्हणजेच "व्हाऊचर" होय. व्हाऊचर चे प्रकार खालील प्रमाणे आहेत:

१. देयक व्हाऊचर – देयक व्हाऊचर हे छापील मानक नमुन्यामध्ये असते, ती देयकाची नोंद असते. जेव्हा एखाद्या खर्चासाठी देयक दिले जाते, तेव्हा त्याच्या पूर्ण वर्णनाच्या नोंदीसाठी ज्यावर एका व्यक्तीचा किवा देयक मिळविणाऱ्या संस्थेचा पूर्ण अधिकार असतो, सर्वसाधारणपणे एक स्वतंत्र बिल बनविण्यात येते. या बिलावरून अकौंट खाते अकौंट व्हाऊचर तयार करते, जे प्रत्येक देयांकासाठी बनविले जाते, याचा काही संबंध नाही की देयक हे वस्तू विकत घेण्यासाठी दिले आहे किवा कुणा कर्मचाऱ्याचे वेतन देयक दिले आहे किवा कुणाच्या सेवेसाठी देयक दिले आहे किवा कुठली मालमत्ता खरेदी करण्यासाठी देयक दिले आहे किवा विद्युत बिल भरण्यासाठी देयक दिले आहे.

२. जमा व्हाऊचर- जमेचे व्हाऊचर हा एक दस्त ऐवज असतो जो पैसे मिळाल्यावर त्या दाखल्यास्तव दिला जातो. त्याचा एक छापील मानक नमुना सुद्धा असतो. हा दस्त ऐवज असे दर्शवितो की ठराविक रक्कम एखाद्या व्यक्तीकडून किवा संस्थेकडून विशिष्ठ दिवशी मिळालेला आहे आणि त्यामध्ये तो पैसा कोणत्या विशिष्ठ हेतूसाठी मिळाला आहे यांची माहिति सुद्धा अंतर्भूत असते. एका जबाबदार कर्मचाऱ्याची त्यावर स्वाक्षरी सुद्धा असते ज्याला व्यवस्थापनाने पैसे घेण्यासाठी अधिकृत केले आहे.

३. हस्तांतरण व्हाऊचर – हस्तांतरण व्हाऊचर हे व्यावहारिक अवशेषांच्या नोंदीसाठी वापरले जाते.एक अंतर्गत व्यवहार किवा ज्या व्यवहारांमध्ये रोख रक्कमेचे देयक किवा जमा नसते, असे व्यवहार हस्तांतरण व्हाऊचर मध्ये नोंदविले जातात. उदा.आहेत उधारीवर माल विकत घेतला, मालमत्तेवर घसारा नोंदविला, देय असलेले खर्च,येणे असलेले उत्पन्न इ.

माल

मालामध्ये प्रत्येक प्रकारची मालमत्ता हि अतंर्भूत असते जसे जमीन,इमारत,यंत्रणा, फर्निचर,कपडे,वाहने,अलंकार इ. तरीही अकौंट मध्ये त्याचा अर्थ मर्यादित आहे तो केवळ त्या वस्तूंच्या पुरताच ज्या व्यापाराने ग्राहकांना विकण्याच्या एकमेव उद्दिष्टाने ताब्यात घेतल्या आहेत.उदा. जर एका व्यापाराने वैयक्तिक संगणक विकत घेतले, ते व्यापारासाठी “माल” म्हणून समजण्यात येतील, जर त्याचा व्यवहार वैयक्तिक संगणकांची खरेदी आणि विक्री करण्याचा असेल , पण हाच व्यापार तयार कपडे खरेदी विक्री करण्याचा असेल तर तेव्हा वैयक्तिक संगणक त्या व्यापाराची मालमत्ता असेल आणि त्याला “माल” असे म्हणता येणार नाही. मालामध्ये खरेदी,विक्री,विक्री केलेला माल परत येणे,खरेदी केलेला माल परत देणे या गोष्टींचा समावेश असतो. तरीही खरेदी खाते,विक्री खाते,विक्रीचा माल परत आलेल्याचे खाते, खरेदी केलेला माल परत दिल्याचे खाते हि सर्व खाती अकौंट च्या पुस्तकांत उघडावी लागतात.

अस्तित्व

अस्तित्वाची व्याख्या म्हणजे एखादी व्यक्ती किवा एखादी संस्था जिला कायदेशीर आणि ओळखता येण्यासारखे अस्तित्व आहे. अकौंट मध्ये व्यापाराची अस्तित्वाची अशी व्याख्या केली जाते की हि एक आर्थिक संस्था जिची स्वतःची ओळख आणि व्यवहार स्वतंत्र आहेत, जी मालाच्या खरेदी आणि विक्रीमध्ये आणि परिणामकारक सेवा देण्यामध्ये गुंतलेली आहे, त्यासाठी ती तिच्याकडे उपलब्ध असलेल्या आर्थिक साधनांचा पुरेपूर आणि परिणामकारक वापर करीत आहे, त्यांतून ती फायदे मिळवित असून स्वतःचे अस्तित्व टिकवून आहे आणि ज्या समाजांमध्ये ती कार्यशील आहे त्या समाजाच्या उत्कर्षासाठी प्रयत्नशील आहे. उदा.

अस्तित्वामध्ये वयक्तिक,एकमेव मालकी व्यापार, भागीदारी व्यापार,कंपन्या,सामाजिक, विना फायदे तत्वावर चालणारी संस्था, ऐच्छिक संस्था,एन.जी.ओ.संस्था, सरकारी संस्था इ.

भांडवल

मालकाने संस्थेमध्ये गुंतविलेली रक्कम हि "भांडवल" म्हणून ओळखली जाते. ती मालकाकडून कधी रक्कमेच्या स्वरूपांत तर कधी मालमत्तेच्या स्वरूपांत आणली जाते. भांडवल हे एक बंधन असून व्यापाराच्या मालमत्तेवरील एक दावा आहे. म्हणून भांडवल हे ताळेबंदामध्ये देयतेच्या बाजूला दर्शविले जाते.भांडवल हे प्रामुख्याने कर्ज आणि मालकाची इक्विटी यांमध्ये विभाजित होते.इकडे दोन्ही प्रकारच्या वित्त पुरावठ्याना स्वतःचे स्वतंत्र फायदे आहेत, प्रत्येकासाठी काहीतरी किंमत मोजावी लागते. कर्ज रूपी भांडवल म्हणजे कर्ज रुपाने आणलेले निधी ज्यांची नंतरच्या एका तारखेला नेहमी व्याजासहित परतफेड करावीच लागते. हे अल्पकालीन कर्जे ज्यांची एका वर्षभरातच परतफेड करावयाची असते त्यांपेक्षा दीर्घकालीन भांडवलाला ,विशेषतः बॉन्ड्स यांना सूचित करतात. कर्जांची इतर उदाहरणे द्यावयाची झाली तर ट्रेड क्रेडीट ,बँक आणि क्रेडीट युनियन ची कर्जे, ओव्हरड्राफ्ट करार, फाक्टोरिंग इ. मालकाची इक्विटी म्हणजे व्यापारामध्ये गुंतविलेल्या भांडवलाची रक्कम होय. टी संस्थेच्या भांडवलातील त्या भागाला सूचित करते जो भाग व्यापारी संस्थेमध्ये मालकी हक्काच्या भागांच्या बदलीतून तयार झालेला असतो.

मालमत्ता

मालमत्ता हि संस्थेची आर्थिक साधने असतात ती उपयोगीतेच्या दृष्टीने त्यांचे वित्तीय /आर्थिक तत्वांमध्ये वर्णन केले जाते आणि त्यांना नेहमी निधी गोळा करण्याचे स्त्रोत असे म्हटले जाते. या मालमत्तेला आर्थिक मूल्य असते ते व्यक्तीच्या किवा संस्थेच्या ताब्यात असते आणि ते भविष्यात काही आर्थिक फायदा कमविण्यासाठी सक्षम असते. या मालमत्ता सर्वसाधारणपणे व्यापारांत त्यांच्यापासून फायदा कमविण्यासाठी आणि व्यापाराचे मूल्य वाढविण्यासाठी आणल्या जातात. मालमत्ता म्हणजे अशा जिनसा ज्यांचे मूल्य व्यापाराने आपल्या कामाकाजांत वापरलेले असते.

मालमत्तेचे वर्गीकरण

मालमत्ता वेगवेगळया प्रकारे विभाजित होते, त्यासाठी आधार खालीलप्रमाणे असतो-

१. रक्कमेत होणारे परिवर्तन
२. व्यापारांत होणारा वापर
३. त्यांच्या शरीरिक अस्तित्वाच्या आधारे

१. रक्कमेत होणारे परिवर्तन

मालमत्तेचे रक्कमेत परिवर्तन होण्याच्या आधारे मालमत्तेचे विभाजन वर्तमान मालमत्ता आणि स्थायी मालमत्ता असे होते.

अ) वर्तमान मालमत्ता – वर्तमान मालमत्ता हि अल्पकालीन कालावधीच्या आधारे तयार होते. ती सहजतेने रोख रक्कमेमध्ये परावर्तीत होऊ शकते. वर्तमान मालमत्ता हि कमी कालावधी पुरती मर्यादित असते हा कालावधी सर्वसाधारणपणे एक वर्षांहून कमी असतो, स्थायी मालमत्तेशी तुलना करता स्थायी मालमत्ता हि दीर्घकालीन असते. व्यापारांतील देणेकरी ज्यांच्यामध्ये देणेकरी (पैसे देण्याजोगी खाती), मिळण्याजोगी बिले (मिळण्या जोग्या नोट्स ) माल ( मालाची यादी), तात्पुरती विक्रीयोग्य सुरक्षा, रक्कम रोख आणि बँकेतील शिल्लक,अल्पकालीन गुंतवणुकी, स्थायी जमा ज्यांची मुदत एक वर्षाहून कमी आहे, उत्पन्न जे घेय आहे परंतु मिळालेले नाही, आगाऊ केलेला खर्च इ. यांना वर्तमान मालमत्तेमध्ये गाडले जाते.

आ) स्थायी मालमत्ता – स्थायी मालमत्ता या त्वरित रोख रक्कमेमध्ये परावर्तीत होऊ शकत नाहीत.त्यांना “अवर्तमान मालमत्ता / दीर्घकालीन मालमत्ता / कठोर मालमत्ता “ असे सुद्धा म्हटले जाते. स्थायी मालमत्ता या दीर्घकाळा करिता आयोजित केलेल्या मालमत्ता असतात जसे जमीन, इमारत , यंत्रणा, उद्योग वसाहत, उपकरणे, फर्निचर आणि फ़िक्श्चर इ.  या मालमत्ता दररोजच्या व्यापार उद्योगांतील कामकाजांसाठी वापरल्या जातात आणि त्यांचा उपयोग हा उत्पन्न कमाविण्यासाठी होतो. या मालमत्तेवर घसारा सुद्धा लाविला जातो.

२. शारीरीक अस्तित्व- मालमत्ता या शारीरीक अस्तीत्वाच्या आधारे सुद्धा विभाजित केल्या जातात ह्यानुसार, मालमत्ता हि कधी स्पर्शजन्य मालमत्ता असू शकते किवा अस्पर्शजन्य मालमत्ता असू शकते.

अ) स्पर्शजन्य मालमत्ता – मालमत्ता ज्यांना आपण स्पर्श करू शकतो , बघू शकतो , अनुभवू शकतो त्यांना स्पर्शजन्य मालमत्ता असे म्हणतात. सगळ्या स्थायी मालमत्ता या स्पर्शजन्य असतात उदा.उद्योग वसाहत,यंत्रणा,इमारत,फर्निचर आणि फ़िक्स्चर इ. काही वर्तमान मालमत्ता जसे मालाची यादी, रोख रक्कम यासुद्धा स्पर्शजन्य मालमत्ता आहेत.

आ) अस्पर्शजन्य मालमत्ता – मालमत्ता ज्यांना आपण न कधी स्पर्श करू शकतो , न कधी बघू शकतो , न कधी अनुभवू शकतो त्यांना अस्पर्शजन्य मालमत्ता असे म्हणतात. गुडविल , फ्रान्चीसी करार,पेटंट ,कॉपीराईट,ट्रेड मार्क इ. हि काही अस्पर्शजन्य मालमत्तेची उदाहरणे आहेत. या

अस्पर्शजन्य मालमत्ता सुद्धा मालमत्तांमध्ये विभाजित केल्या जातात कारण व्यापाराचे मालक या मालमत्तांच्या सहाय्याने आर्थिक फायदे कमवितात.

३. व्यापारांतील वापर – या मालमत्तेच्या विभाजनाप्रमाणे मालमत्ता या वापरांतील मालमत्ता आणि न वापरांतील मालमत्ता यामध्ये विभाजित केल्या जातात. हे विभाजन उद्योग संस्थेमध्ये होणाऱ्या मालमत्तेच्या वापरांच्या आधारांवर अवलंबून असते. सर्वसाधारणपणे ज्या मालमत्ता या संस्थेच्या दररोजच्या कामकाजांमध्ये वापरल्या जातात त्यांचे विभाजन वापरांतील मालमत्ता आणि इतर मालमत्तांचे ज्या दररोजच्या कामकाजांमध्ये वापरल्या जात नाहीत त्यांचे विभाजन न वापरांतील मालमत्ता असे केले जाते. सोप्या शब्दांत सांगायचे झाले तर वापरांतील मालमत्ता या अशा मालमत्ता असतात की ज्यांचा उपयोग कंपनी उत्पादन निर्मितीसाठी किवा सेवा पुरविण्यासाठी करत असते. यांमध्ये रोख रक्कम,मालाची यादी,बँकेतील शिल्लक, सैल साधने, उद्योग वसाहती,उपकरणे इ यांचा समावेश असतो. तर दुसरीकडे त्या मालमत्ता ज्यांचा उपयोग उद्योग प्रस्थापित करण्यासाठी केला जातो आणि या मालमत्ता उद्योगाच्या भविष्यातील गरजांसाठी अत्यावश्यक असतात त्यांना न वापरल्या जाणाऱ्या मालमत्ता असे म्हटले जाते. यांमध्ये काही भूसंपत्ती तील गुंतवणूक जिची भविष्यातील वाढती किमत लक्षात घेता कमाविण्याची सुसंधी आहे या हेतूने घेतलेली आहे अशा मालमत्तांचा समावेश असतो. उदा. मालमत्तेची किमत सतत वाढणारी आहे.

देयता:

दोन्ही लहान व मोठया उद्योगांना एका ठराविक वेळेला किवा त्यानंतर कर्जाऊ पैसे आणण्याची गरज भासते. उद्योगासाठी ती एक देयता असते.देयता म्हणजे कर्जे किवा बंधने असतात जी संस्थेला भविष्यातील एका विशिष्ठ तारखेला परतफेड करावयाची असतात. देयतांवरील तोडग्यातून परिणामी रोख रक्कमेची जावक वाढते. यांतून देणेकरी लोकांचे संस्थेच्या मालमत्तेवरील दावे दर्शविले जातात. देयता या दीर्घकालीन देयता आणि अल्पकालीन देयता असतात. दीर्घकालीन देयताना अ वर्तमान देयता असे सुद्धा म्हणतात या देयता त्या असतात की ज्या रिपोर्टिंग तारखेपासून एका वर्षानंतर देय होत असतात. आर्थिक संस्थांकडून घेतलेली कर्जे आणि कर्जरोखे वाटप करून उभारलेला निधी हि दीर्घकालीन देयातांची काही उदाहरणे आहेत. अल्पकालीन देयताना “वर्तमान देयता” असे सुद्धा म्हणतात. हि बंधने रिपोर्टिंग तारखेपासून एका वर्षाच्या आंत देय होत असतात. उदा.एक वर्षाच्या आत देय असलेले बँकेचे कर्ज , सावकार, देय खाती, बँक ओव्हरड्राफ्ट इ.

माल

मालाची यादी किवा माल म्हणजे काहीतरी हातात असलेले मोजमाप असते जसे वस्तू, अतिरिक्त आणि व्यापारातील इतर जिनसा इ. याला हातात असलेला माल असे म्हणतात. एका व्यापारी संस्थेमध्ये हातात असलेला माल म्हणजे आर्थिक वर्षाच्या शेवटी राहिलेली न विकल्या गेलेल्या वस्तूंची किंमत त्याला "अखेरीचा मालाचा साठा " असे संबोधतात.(वर्षाखेरील मालाची यादी) एका उत्पादक कंपनी मध्ये अखेरीच्या मालाच्या साठ्यामध्ये हातात असलेला कच्चा माल, अर्धवट पक्का माल आणि पक्का माल जो शेवटच्या दिवशी शिल्लक होता त्यांचा समावेश केला गेला. त्याचप्रमाणे प्रारंभीच्या माल साठ्या मध्ये (प्रारंभीच्या मालाची यादी) मालाची किंमत जी आर्थिक वर्षाच्या प्रारंभी हातात होती त्यांचा समावेश केला गेला.

माल म्हणजे व्यापाऱ्याने, वितरकाने, उत्पादकाने इ.गिऱ्हाईकाला विकण्यासाठी हातात ठेवलेल्या मालाचा पुरवठा असतो. यालाच "मालाची यादी" असे सुद्धा म्हणतात. मालाला असे सुद्धा म्हटले जाते की एखादी वस्तूंची सख्या जी भविष्यातील वापरांसाठी एकत्रित आणली आहे जसे तरतुदींची माल यादी इ.

विक्री

अकौंट मध्ये विक्रीतून कंपनीने कमाविलेला दररोजच्या कामकाजांतून जसे माल विक्रीतून,सेवा प्रदान करण्यांतून गोळा झालेला महसूल "विक्री" या संज्ञेत येतो. यांमधून विकत घेणारा आणि विकणारा यांच्यातील करार सुद्धा सूचित केला जातो आणि ठराविक माल आणि सेवेसाठी तो त्यांच्यातील करार म्हणून अस्तित्वात येतो. विक्री हा दोन पार्ट्या मधील व्यवहार असतो जेथे विकत घेणारा स्पर्शजन्य किवा अस्पर्शजन्य माल मिळवितो किवा उद्योगसंस्थेने दिलेल्या सेवा मिळवितो.कायदेशीर विक्री होण्यासाठी खालील बाबीं, वैशिष्ठ यांचा समावेश होणे हे रास्त असते:

१. विक्रेता आणि खरेदी करणारा या दोघांची करारा मध्ये प्रवेश करण्याची क्षमता;
२. विनिमयाच्या अटींसाठी त्यासंबंधी परस्पर करार;
३. काहीतरी जे हस्तांतरित होण्यासाठी सक्षम आहे (वस्तू.मालकीचे शीर्षक, विशिष्ठ सेवेचा अधिकार );
४. वस्तूंची आर्थिक पैशांच्या स्वरुपांतील किंमत (किवा त्यांचे समसमान मूल्य) जी देय केलेली आहे किवा भविष्यात देण्यास वचनबद्ध आहे.

उत्पन्न

जो पैसा उद्योग क्रिया करण्यांतून परिणामी कमविला जातो त्याला उत्पन्न आस म्हणतात. कुठल्याही व्यापारी संस्थेचा महसूल त्यांतील सर्व खर्च आणि कर वजा जाता त्याला उत्पन्न किवा व्यापारांतील उत्पन्न असे म्हणतात. व्यापारांतील उत्पन्न हे प्रत्येक वर्षी एकतर सकारात्मक असते किवा नकारात्मक असते.

महसूल

जे उत्पन्न वस्तूंच्या विक्रीमधून किवा सेवा प्रदान करण्यांतून कमविले जाते किवा भांडवलाच्या अगर मालमत्तेच्या, ज्या संस्थेच्या मुख्य कार्यांशी संबंधित आहेत, इतर उपयोगांतून आणि ती किंमत मिळविण्यासाठी त्यावर कोणताही खर्च करण्या अगोदर, जी रक्कम असते, तीला "महसूल" असे म्हणतात. महसूल हा फायद्यांपासून वेगळा असतो. एका आर्थिक वर्षामध्ये उद्योग व्यापाराने वस्तू आणि / किवा सेवा विकून मिळविलेली एकूण रक्कम म्हणजे महसूल , त्याला एकूण उत्पन्न असे सुद्धा म्हटले जाते. या ठिकाणी एक मुद्दा महत्वाचा आहे तो असा की जर व्यापाराची(संस्थेची) सत्य आणि अचूक परिस्थिती मांडावयाची असेल तर हे उत्पन्न मिळविण्यासाठी आलेला खर्च यांची वजावट घ्यावी लागते. येथे आपण एका उत्पन्नाच्या पाशी येतो ज्याला "एकूण उत्पन्न" असे म्हणतात, ज्यामध्ये वर्तमान आणि भावी गुंतवणूकदार आणि अकौंट माहितीचा वापर करणारे इतर लोक हे निर्णयात्मक निश्कर्ष काढण्यासाठी / घेण्यासाठी उत्सुक असतात. निव्वळ उत्पन्न हे उद्योगाच्या आर्थिक स्थितीसाठी एक परिणामकारक बारोमीटर असते. महसूल दोन प्रकारचे असतात अ) कार्यरत असलेला महसूल ज्याला विक्री असे सुद्धा म्हणतात, आणि ब) अकार्यरत असलेला महसूल ज्यांतून एकाच वेळी विशिष्ठ घटनेला होणारा उत्पन्नाचा भाग सूचित होतो. अकार्यरत महसुलाची उदाहरणे देता येतील जसे मालमत्तेची विक्री, गुंतवणुकीतील आकस्मिक चढ उतार यांतून मिळणारे उत्पन्न इ.

खरेदी

खरेदी मध्ये त्या क्रियेचा समावेश असतो जी संघटनेची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी माल किवा सेवा विकत घेण्याची क्रिया असते. एकतर उधारीवर अगर रोख पैसे देऊन उद्योगाने मिळविलेल्या एकूण वस्तूंची किंमत जी असते तीला "खरेदी" असे म्हणतात. खरेदी एकतर उद्योगांतील , व्यापारांतील कार्यकारिणीच्या उपयोगिते साठी केली जाते किवा ती त्यावर पुढची क्रिया करून अथवा न करता पुनर्विक्रीसाठी त्या हेतूने केली जाते. खरेदीची मुख्य उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत ती अशी -:

अ) कंपनीच्या उत्पादनांचा दर्जा आणि मूल्य राखण्यासाठी

आ) आवकेचा प्रवाह आणि जावकेचा प्रवाह यांच्यातील ओघ कायम राखण्यासाठी

इ) संघटनेची स्पर्धात्मक स्थिती बळकट करण्यासाठी